ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017


REVIEW OF RESEARCH

# बसवेश्वरांचा अर्थवाद

**डॉ. सुहास रंगनाथ मोराळे[१] , निंगप्पा सिद्राम सोमगोंडे[२]**

[१]राज्यशास्त्र विभाग प्रमुख, स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड माजी संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

[२]राज्यशास्त्र विभाग प्रमुख , जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद.



## प्रस्तावना :

महात्मा बसवेश्वरांना अभिप्रेत असलेली सामाजिक परिवर्तनाची क्रांती आणि त्यांचे निर्मितीचे स्वप्न त्यांनी मांडलेल्या आर्थिक तत्त्वज्ञानाशी संबंधित आहे. त्यांना अभिप्रेत असलेला अर्थवाद हा धार्मिक तत्त्वज्ञानाशी व धार्मिक जीवन मूल्यांशी संबंधित आहे. मानवी जीवनाला व्यापणारा धर्म आणि त्यांचा मानवी जीवनावरील प्रभाव बसवेश्वर ओळखून होते. म्हणून तत्कालीन समाजापुढे त्यांनी जो आर्थिक विचार मांडला तो धर्माच्या व धर्मतत्त्वाच्या स्वरूपात.

वैदिक व्यवस्थेतील यज्ञ संस्कृती आणि त्या अनुषंगाने वैदिकांनी घडवून आणलेली धर्म आणि श्रममूल्यांची फारकत ही बसवेश्वरांच्या लक्षात आलेली होती. यज्ञसंस्कृतीमधील कर्मकांडावर हा वस्तुतः सामाजिक उत्पादन व्यवस्थेमधील श्रममूल्याला गौणत्व देणारा होता. श्रमण संस्कृतीमधील पलायन हा पण सामाजिक उत्पादनव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम करणारा होता. समाजामधील या दोषाचा विचार करूनच बसवेश्वरांनी श्रममूल्याला प्रतिष्ठा देऊन कायकवे कैलास, श्रम हाच परमेश्वर, श्रमपूजा हीच परमेश्वरीय पूजा, श्रम हाच स्वर्ग असा धार्मिक उद्‌घोष केला. बसवेश्वरांनी श्रम हीच पूजा असे सांगून सामाजिक, आर्थिक जीवनाला एक बहुआयामी परिमाण मिळवून दिला. कायकवे कैलास म्हणजेच प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडले पाहिजे. कायक या कन्नड शब्दाला अनेक अर्थाचे पैलू आहेत. कायक म्हणजे श्रम, प्रयत्न, मेहनत, कृती, कार्य, नैतिकता, सोपविलेल्या कामाबद्दल अव्यभिचारी निष्ठा, सामाजिक उत्तरदायित्व, समाजाप्रति बांधिलकी, उत्पादन, प्रत्यक्ष श्रम, उत्पादन आणि समाजाप्रति श्रद्धा निष्ठा, सामाजिक न्याय या संकल्पनेशी बांधिलकी यास बहुआयामी शब्दाला कायक एक धार्मिक सिद्धांताचे स्वरूप बसवेश्वरांनी देऊन समाजाला कार्यप्रवण केले आणि संपूर्ण समाजाला समतेच्या मूल्यांवर अधिष्ठित केले. वस्तुतः १९ व्या शतकांत समाजवादी विचारवंतांनी युरोपमध्ये जो समाजवादी समाजरचनेचा नमुना मांडला तो महात्मा बसवेश्वरांनी ८ शतकांपूर्वी मांडला हे विशेष होय. कार्ल मार्क्स व कार्ल मार्क्सच्या पूर्वकालीन समाजवाद्यांनी ज्या शास्त्रीय समाजवादाची मांडणी केली. तिचा हेतू मुख्यतः शोषणविरहित, वर्गविरहित समाज निर्माण करणे हा होता. हा विचार महात्मा बसवेश्वरांनी ८ शतकांपूर्वी मांडून समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वभावाच्या मूल्यावरं आधारित शोषणविरहित समाजरचना निर्माण करण्याचे ध्येय बाळगून ते ध्येय प्रत्यक्ष व्यवहारात आणले.

## उद्देशः

महात्मा बसवेश्वरांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

महात्मा बसवेश्वरांच्या अर्थवादाचा समाजावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

## व्याप्तीः

प्रस्तुत शोधनिबंधासाठी व्याप्ती महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक विचार आहे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला असून द्वितीयक साधनांचा आणि विद्वानांच्या मतांचा आधार घेण्यात आला आहे.

**मर्यादा:**

प्रस्तुत शोधनिबंधाची मर्यादा महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक क्षेत्रातील कामगिरीपुरतीच मर्यादित आहे.

**बसवेश्वरांचे श्रम सिद्धांत:**

श्रम मूल्यांचा सिद्धांत श्रमाचे महत्व प्रतिपादन करतो. श्रम, श्रमाची विभागणी, श्रम मूल्यांची प्रतिष्ठा हा कायक या संज्ञाचा अर्थ आहे. श्रम या संकल्पनेला बसवेश्वरांनी नैतिक व पारमार्थिक बैठक पुरविली. श्रमाची नैतिकता, पारमार्थकता, पावित्र्यता आणि ईश्वरीय पूजा असा वेगळा अर्थ आाणि संदर्भ श्रममूल्याला त्यांनी मिळवून दिला. श्रम करताना किंवा आपले कार्य पार पाडताना आपण हे कार्य परमेश्वराला समर्पित करत आहोत, हा भाव प्रत्येकाने आपल्या मनी जपावा. श्रम हाच परमेश्वर, श्रम हाच स्वर्ग, प्रामाणिक श्रम हीच शिवोपासना असा समृद्ध विचार बसवेश्वरांनी मांडला. बसवेश्वरांच्या या श्रम सिद्धांताचे महत्त्वाचे तीन पैलू आहेत. १. कायक तत्व, २. दासोह तत्त्व, ३. प्रसाद तत्त्व.

बसवेश्वरांनी श्रम तत्त्वाला धार्मिक सिद्धांताचे स्वरूप देऊन प्रत्येक काम, कार्य एकाच दर्जाचे असून कोणतेही कार्य श्रेष्ठ नाही किंवा कनिष्ठ, हलक्या प्रतीचे नाही हे प्रतिपादन केले. श्रमाचे महत्व व उपयुक्तता प्रतिपादन करताना महात्मा बसवेश्वर आणि त्यांच्या समकालीन सहकाऱ्यांनी सांगितले- श्रममूल्य हे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात परिवर्तन घडवून आणते. कार्यात, कर्मात किंवा श्रमात गुंतलेली व्यक्ती अतिशय विशुद्ध होत असते. त्याच्या अंतःकरणातील विकृतीचा ऱ्हास होऊन विकृती लोप पावतात व एका विशुद्ध अंतःकरणाने सत्प्रवृत्त व्यक्तीचा व माणसाचा उदय होतो. याचा परिणाम कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय जीवनावर होऊन हा विचार व्यावहारिक आणि वास्तव जीवनाशी संबंधित केला. व्यक्तीस आर्थिक विचाराची बैठक पुरवून, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे आणि व्यक्तीस स्वातंत्र्याचा लाभ मिळवून देऊन समतेच्या तत्त्वावर संपूर्ण समाजाची आणि समाजामध्ये जीवन जगणाऱ्या व्यक्तीची प्रतिष्ठापना करणे आणि त्यांच्यामध्ये बंधुत्वभाव निर्माण करून एकसंघ समाज निर्माण करणे हा बसवेश्वरांचा हेतू होता. म्हणूनच बसवेश्वरांनी सांगितले, कर्तव्यापेक्षा श्रेष्ठ काही नाही कर्तव्यापूर्ती हेच प्रत्येकाचे ध्येय असावे. कर्तव्यपूर्तीमधूनच स्वर्गप्राप्ती होते. कर्तव्याची पूर्तता हाच मोक्ष होय.

**कायक दासोह:**

वीरशैवांनी शारीरिक श्रमाला अधिक महत्व दिले आहे. 'काय कवे कैलास' हे वचन वीरशैवांचे ब्रीद होते. गुरू लिंग, जंगमांना प्रतिईश्वर असे मानणारे शरण-शरणी 'कायक' प्राणप्रिय मानतात. कायक अर्थात निष्ठेने कर्म करणे जीवनात कर्मयोगालाच महत्व दिले पाहिजे. गुरूचा विसर पडला तरी हरकत नाही, मित्राचा विसर झाला तरी चालू शकतो, कामाचा विसर पडला तरी क्षम्य आहे. परंतु कायकाचा विसर पडून चालणार नाही. कर्तव्य परायणताच जीवनाला सुशोभित करते. श्रमाला आणि श्रमिकांना शरणांनी ज्या पदधतीने महत्व दिले ते जगातले एक अपूर्व उदाहरण आहे. शरीरश्रम न करणाऱ्याला जेवण करण्याचा अधिकार नाही. कष्ठाच्या घामाला ज्या समाजात प्रतिष्ठा नसते त्या समाजाचे नैतिक पतन झालेले असते. एखाद्या वर्गाच्या कष्टाचे शोषण करणे हे थांबले पाहिजे, असे वीरशैव मानतो.

कायकाने केवळ उदरभरण होत नाही तर त्यामुळे समाजाला हव्या असलेल्या प्राणतत्वाची पूर्ती होते. कायकातूनच समाजाच्या उपयोगाकरिता धन-संचय होऊ शकतो. स्वतःचा, स्वतःच्या परिवाराचा विचार म्हणजे निव्वळ स्वार्थ! महात्मा बसवेश्वर म्हणतात. दररोज मी बायको-मुलांचे चिंता करीत असेन तर माझ्या अंतरात्म्याला साक्ष राहावे लागेल.

नुलीय चंदय्यानां: "गुरू, लिंग, जंगम या सगळयांना कायकच मुक्ती देईल हेच ईश्वरज्ञान आहे. अनुभव मंटपातील सर्व शरण-शरणी तल्लीनतेने 'कायक' करीत असत. तसेच गुरू, लिंग, जंगम यांची सेवाही करीत असत. कायकाशिवाय शिवशरण होता येणार नाही.

एखाद्या गोष्ट स्वीकारायची असेल तर ती काया-वाचा-मने स्वीकारली पाहिजे समाज सुधारण्याकरीता सुधारकांना 'बोलावे तसे चालावे' लागते. कथनी करणीतील जर अंतर असेल तर विपरीत परिणाम होत असतो. कायकासंत सर्वज्ञ म्हणतो: जो न बोलता काम करतो, तो उत्तम श्रेणीचा असतो. बोलतो व ते करतो तो मध्यम. बोलतो व त्याप्रमाणे काम करत नाही तो अधम असतो.

"मी बोलतो एक आणि करतो दुसरेच
मग मी शुध्द कसा होईन
हे कुडलसंगमदेवा?
माझी करनी आणि कथनी एक असेल
तर मी तुझ्याशी एकरूप होऊ शकतो."

बसवकालीन शरण समुदायाच वागणे आदर्श होते. ते विचार पूर्वक आत्मानुभवच व्यक्त करीत असत. ते जसे बोलायचे तसेच वागायचे म्हणून त्यांचे आचरण आजही वंदनीय, पूजनीय मानले जाते.

कायकवे कैलास या सिध्दंताशी संबंधित व सिध्दंताशी पूरक असणारा विचार कायक दासोह या त-त्वात मांडलेला आहे. कायक दासोह याचा अर्थ स्वकष्टाने थोडे अधिक मिळविलेले धन स्वत:कडे न ठेवता समाजामध्ये गरजूंना देणे या सिध्दांतामधून प्रत्येक व्यक्तीचे समाजाप्रती असणारे त्याचे वैयक्तिक उत्तरदायित्व स्पष्ट होते. वस्तुतः प्रत्येक व्यक्तीचे हित समाजहितामध्ये सामावलेले असते. समाजाच्या प्रगतीबरोबर व्यक्तीची प्रगती होत असते. म्हणून प्रत्येक व्यक्तीचे कार्य समाजाप्रती असणाऱ्या उत्तरदायित्वाशी संबंधित असणे अपरिहार्य असते. ही जाणीव सर्वांच्यामध्ये निर्माण करण्यासाठी म्हणून बसवेश्वर सांगतात- जनता जनार्दनाला नजरेसमोर ठेवूनच प्रत्येकाने आपले कार्य पार पाडावे. आपले कार्य प्रत्यक्ष परमेश्वराला सर्मपित करत आहोत या जाणिवेमधून आपले कार्य करत राहावे. बसवेश्वरांनी आपल्या अनेक वचनामधून ती भावना प्रकट केलेली आहे. त्यांना प्राणप्रीय असलेल्या कुडलसंगमाला ते आपले कार्य सर्मपित करतात. कोणतेही कार्य परमेश्वराला सर्मपित करण्याच्या या विचाराला दोन पैलू आहेत. १. जे कार्य परमेश्वराला सर्मपित करावयाचे आहे ते कार्य पवित्र भावनेने केले जाते. २. ज्या कार्याबाबत फळाची अपेक्षा न धरता व्यक्तित्व भावनेचा लोप करून व आत्मविसर्जन करून ते कार्य परमेश्वराला म्हणजेच समाजाला अर्पित करणे होय. ही वस्तुतः आत्मशुध्दीची व आत्मत्यागाची एक पवित्र प्रक्रिया असून व्यक्तीचा अंतबाह्य बदल व विकास त्यामध्ये अपेक्षित आहे.

हे परमेश्वरा तू दिलेले सर्व काही मी तुलाच अर्पण करतो, हे बसवेश्वर आपल्या वचनामधून सांगतात

"आरंभितो मी व्यवसाय, पुजण्या मम गुरूपार
करितो मी व्यवहार, इष्टलिंगार्चनास्तव सारा
सेवा करिता सदैव, जंगम दासोहात्सव
माझे विविध कर्माचे प्रतिफळ रोख, तू देणार हे असे मज ठाउक
तू मज दिलेले संपद, कुडलसंगमदेवा"
करितो मी तुजसंबंधीच व्यय, ....... बसव वचनामृत ९५

बसवेश्वरांच्या कायक सिध्दांतासंबंधीच्या वचनाचा अभ्यास करताना आपणास हेच जाणते की, बसवेश्वरांचा श्रमतत्व संबंधीचा विचार तत्कालीन उच्चभ्रू समाजामध्ये वाढलेल्या ऐतखाऊ व शोषणवृत्तीवर एक प्रकारची टीका आहे. शोषक समाजाला योग्य ती सामाजिक जाणीव देऊन समाजाप्रती असलेल्या त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देऊन सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात त्यांना सहभागी करून घेण्याचे महानकार्य बसवेश्वरांनी केलेले आहे.

कायकवे कैलास आणि कायक दासोह या तत्वाने निष्क्रियतेचे व स्वार्थी भावनेचे उच्चाटन केले आहे.

## निष्कर्ष:

कायकवे कैलास आणि कायक दासोह या तत्त्वांने निष्क्रीयतेचे व स्वार्थी भावनेचे उच्चाटन करून समाज स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

## संदर्भ ग्रंथ:


१) डॉ. राजशेखर हिरेमठः- वीरशैव साहित्य संशोधन, पान नं. ४२.
२) वीरशैव समाजाचे तत्त्वज्ञानः- पान नं. १४ व ८८.
३) महात्मा बसवेश्वरांचा कायक सिध्दांतः डॉ. भिमराव पाटील पान.नं- ३ व ४
४) डॉ. घुगरेः- भारतातील वीरशैव तत्त्वज्ञान, पान नं. २३५.